Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 469 – 472
DOI: 10.5281/zenodo.10135288

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे आर्थिक आणि शैक्षणिक विचार

प्रा. डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद जि. नांदेड ४३१७१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: kalejeetendra43@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी हे मानवतेचे थोर उपासक होते. गांधींचा जन्म 02 ऑक्टोंबर 1869 रोजी गुजरात येथील पोरबंदर येथे झाला. महात्मा गांधीजींच्या जीवनावर टॉलस्टॉय, रस्कीन व थोरो या विचारवंतांचा प्रभाव पडला होता. रस्कीन यांच्या 'Unto this last' या ग्रंथावरुन गांधीजींनी 'सर्वोदय' हा ग्रंथ लिहिला. सर्वोदय या कल्पनेत गांधीजींना सर्वांचाच उदय अभिप्रेत आहे. टॉलस्टॉय यांच्या 'Kingdom of god within you' या ग्रंथामुळे ते अहिंसेचे पुजारी व सत्याचे उपासक बनले होते. भारत देशामध्ये 1920 ते 1948 हा काळ 'गांधी युग' म्हणून ओळखला जातो.

म.गांधीजींनी 1914 पासून भारतात लोकजागृतीचे कार्य हाती घेतले. त्यांनी खऱ्या अर्थाने 1919 पासून राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधीकडे 1 ऑगस्ट 1920 ला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या निधनानंतर आले. देशाच्या स्वातंत्र्याला पोषक वातावरण म.गांधीजींनी निर्माण केले. बलाढ्य साम्राज्यशक्तीशी आत्मिक शक्तींनी लढा देण्याचे सत्याग्रहाचे तंत्र महात्मा गांधीनी दक्षिण आफ्रिकेत विकसित केले. सत्य, अहिंसा व असहकाराचे धोरण गांधीजींनी स्वीकरले. अनेक प्रकारची आंदोलने करून त्यांनी सरकारला घाईला आणले. कायदेभंग, विदेशी वस्तूंवर बहिष्कार, मीठाचा सत्याग्रह, छोडो भारत इत्यादी आंदोलनामधून त्यांनी लोकजागृती केली.

सत्य आणि अहिंसा या तत्त्वावर राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण याचे संघटन गांधीजींनी केले होते. जे अर्थशास्त्र दुर्बलांचे शोषण करून पिळवणूक करून संपत्ती कमावयास शिकवते ते अर्थशास्त्र गांधीजींना मान्य नव्हते. खेडे हा भारताचा केंद्रबिंदू मानून महात्मा गांधीजींनी देशाची अर्थव्यवस्था डोळ्यासमोर ठेवली होती. खेड्यापासून निर्माण

होणाऱ्या कुटीर व छोट्या उद्योगातून मोठमोठी उद्योगाचे वलय निर्माण होईल. हे गांधीजींच्या अर्थव्यवस्थेचा पाया होता. लोकांमध्ये स्वराज्यशक्ती निर्माण करण्यासाठी त्यांना खादी ग्रामोद्योग व ग्रामस्वराज्य अभिप्रेत होते.

महात्मा गांधीजींच्या अर्थरचनेत यांत्रिकीकरणाला विरोध नव्हता. पण जीवनाची समृद्धी जीवनाच्या व्यापकतेने मर्यादित व्हावी, विज्ञानाच्या रथाला बाजाराचा घोडा जोडला जाऊ नये, अर्थकारण अर्थाचे मूळ ठरू नये असा इशारा गांधीजींनी दिला होता. यांत्रिकीकरणामुळे बेकारी वाढू नये म्हणून 'हॉर्स पॉवर' ऐवजी 'मॅन पॉवर' श्रेष्ठ व प्रतिष्ठित आहे.

**महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार**

भारतीय अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. गांधीजींच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये लघु व कुटीरोद्योगाचे प्राबल्य होते. संपूर्ण अर्थव्यवस्थेला लागणाऱ्या वस्तुंचा पुरवठा करण्याची क्षमता या कुटीर उद्योगामध्ये होती. पण ब्रिटिश वसाहतीमुळे कुटीर उद्योगाची स्थिती बिकट बनली होती. कारण ब्रिटिश उद्योगामुळे कुटीर उद्योग नामशेष होऊ लागले होते. त्यामुळे गांधीजींनी आधुनिक यांत्रिकीकरणाला विरोध केला. गांधीजींच्या मते, छोटी व साधी यंत्रे वापरल्यामुळे उत्पादन क्रिया केंद्रित होण्याची भीती नसते आणि यामुळे नफ्याचे विकेंद्रीकरण होण्यास मदत होते.

गांधीजीच्या मते, मानवाजवळ केवढेही बुद्धी कौशल्य असले तरी पावसाप्रमाणे सर्व शेतजमीन तो समप्रमाणात भिजवू शकत नाही. मानवाने बांधलेले बांध, धरणे व कालवे सर्वच अपूर्ण आहेत. गांधीजी म्हणतात, चरख्यामध्ये लक्षावधी कुटुंबाला काम व दाम पुरविण्याची क्षमता आहे. म्हणून त्यांनी मोठ्या उद्योगाला विरोध केला. नाही तर असे मोठे उद्योग हे सार्वजनिक क्षेत्रात उभारले पाहिजेत. कारण ते राष्ट्रीयकृत उद्योग म्हणून कार्य करतील.

मोठ्या उद्योगाच्या केंद्रीकरणामुळे संपत्तीचेही केंद्रीकरण होते. म्हणूनच वस्तुचे उत्पादन लहान प्रमाणावर अनेक ठिकाणी झाले पाहिजे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाल्यास त्यातून आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होऊन विषमता वाढते. त्यामुळे गांधीजींनी लघुउत्पादन व त्यातून कोट्यवधी लोकांना रोजगार कसा निर्माण होईल याचा विचार केला होता. कुटीर उद्योगामुळे अनेक आर्थिक, सामाजिक व राजकीय समस्या सुटतात. गांधीजींनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास करूनच आपल्या देशाला आजच्या परिस्थितीत कुटीर उद्योग महत्त्वपूर्ण ठरेल.

महात्मा गांधीजींच्या मते, देशातील भांडवलदार व जमीनदार वर्गानी शेतकरी व श्रमिकांचे विश्वस्त म्हणून काम पहावे. तसेच स्वतःजवळील संपत्तीचा जनकल्याणार्थसाठी त्या संपत्तीचा विनियोग करावा. गांधीजींना असे वाटत होते की, संपत्ती ही व्यक्तिगत नसून ती संपूर्ण समाजाची आहे. त्यामुळे प्रत्येक भांडवलदाराने स्वतःच्या गरजेइतकीच संपत्ती ठेवून घ्यावे आणि शिल्लक राहिलेल्या संपत्तीचा वापर समाजाच्या हितासाठी केला पाहिजे. या संकल्पनेविषयी काही विचारवंतांच्या मते, पृथ्वीवरील शोषून घेतलेले पाणी सूर्य सहस्त्रधारांनी पृथ्वीला परत करतो. त्याचप्रमाणे धनिकांनी समाजातून जमा केलेली संपत्ती समाजाला परत करावी. अशा पद्धतीची आदर्श विश्वस्त संकल्पना गांधींना मान्य होती.

विश्वस्त संकल्पना वास्तवात उतरविणे कठीण असले तरी अशक्य नाही असे गांधीजींनी म्हटले आहे. भांडवलदार व जमीनदार वर्गांनी स्वतःसाठी जेवढी संपत्ती लागते तेवढी संपत्ती घ्यावी आणि शिल्लक राहिलेल्या संपत्तीचे आपण विश्वस्त आहोत ही भावना ठेवावी. विश्वस्त कल्पनेमुळे शोषक व शोषित असा संघर्ष निर्माण होणार नाही. भांडवलदार वर्गानी समाजाचे विश्वस्त होऊन ती संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी खर्च करावे असे गांधीजींचे मत होते. तसेच सरकारने उद्योगधंदे स्वतःच्या हाती घेऊन लोकहितार्थ चालवावे, उत्पादन हे उत्पादकाच्या स्वार्थ हेतूने न घेता समाजाच्या गरजेप्रमाणे व कल्याणासाठी झाले पाहिजे. गरीब-श्रीमंत यातील तफावत गांधीजींना मान्य नव्हती.

महात्मा गांधीजींच्या मते, विश्वस्त कल्पनेमुळे समाजातील अनेक समस्या आपोआप दूर होतील. देशातील आर्थिक विषमता व त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनेक समस्या नष्ट होतील. गरीब-श्रीमंत यांच्यातील तफावत दूर करण्यासाठी ही कल्पना अत्यंत योग्य आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र स्वतःचे कल्याण यामुळे विश्वस्त कल्पनेला छेद बसला आहे.

गांधीच्या आर्थिक विचारात विविध प्रश्न सोडविण्याचे उपाय आहेत. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे हा त्यापैकीच एक होय. शेतकरी जगाचा पोशिंदा मानला जातो मात्र त्याच्यावर आज आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. दुष्काळाच्या सतत झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी गांधींचा आर्थिक विचार मार्गदर्शक ठरणारा आहे.

**महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार**

- भारतावर 1918 ते 1947 पर्यंत इंग्रजांची सत्ता होती. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यांच्या सरकारला लागणारे कारकून तयार करणारे शिक्षण भारतीयांना दिले. त्यामुळे म.गांधीनी हिंदीला राष्ट्रभाषा मानून त्यांनी हिंदीतून शिक्षण असावे असा आग्रह धरला.
- भारतात निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे शोषित, पीडित जनतेला सावकार व जमीनदार, नोकर वर्गाच्या छळापासून, संकटातून सोडवायचे असेल तर भारतीयांना प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून साक्षर करणे गरजेचे आहे. त्यासाठी म.गांधीनी प्रौढ व स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला होता.
- म.गांधीजींच्या मते, शिक्षणामधूनच समाजाची उन्नती साधता येते आणि मनुष्याचा सर्वांगीण विकास साधला येतो.
- शिक्षण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. शिक्षणातूनच मनुष्याचा सर्वांगीण विकास साधला जातो. शिक्षणातून समाजाची उन्नती साधता येते.
- शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनाचा दृष्टिकोन व्यापक झाला पाहिजे.
- शिक्षण व्यक्तीला स्वावलंबी बनविणारे असावे. ते परावलंबी नसावे.
- प्राथमिक शिक्षण राज्यात नि:शुल्क व अनिवार्य असावे.

**समारोप**

महात्मा गांधीजींच्या मते, भारत हा देश खेड्यांचा देश आहे. भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण झाली पाहिजेत. त्यामुळे प्रत्येक खेडयाने आपल्या मूलभूत गरजांची पुर्तता स्वतः करुन घ्यावी. खेड्यांचा विकास झाला की, आपोआपच देशाचा विकास होईल असा व्यापक दृष्टिकोन गांधीजींचा होता. भारतातील असंख्य लोकांना रोजगार पुरविण्याची क्षमता लघु व कुटीरोद्योगामध्ये आहे. त्यामुळे खादी व ग्रामोद्योगांचा पुरस्कार गांधीजींनी केला होता. चरखा प्रतिकात्मक स्वरूपात स्वीकारुन मोठ्या भांडवली उद्योगांना विरोध केला. महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्राला नितीशास्त्राची जोड देऊन अर्थशास्त्रीय विचार व्यावहारिक पातळीवर उतरविला. आर्थिक विचार लोककल्याणकारी भूमिकेतून उपयुक्त ठरले पाहिजेत असे त्यांच्या आर्थिक विचारांतून दिसून येते.

शिक्षणामुळे माणसाचा सर्वांगीण विकास होतो असे गांधीजींचे ठाम मत होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असे त्यांना वाटत होते. त्यांचे शैक्षणिक विचार आजही प्रासंगिक आहेत.एकंदरीत महात्मा गांधीच्या आर्थिक आणि शैक्षणिक विचारांची अंमलबजावणी केली गेल्यास राष्ट्राची उन्नती होईल.

**संदर्भ सूची**


१. यांनी घडवलं सहस्त्रक-सुहास कुलकर्णी, रोहन प्रकाशन

२. शोध गांधीचा-चंद्रशेखर धर्माधिकारी, अक्षर प्रकाशन

३. भारतीय राजकीय विचारवंत- डॉ.व्हि.जी. कुलकर्णी/प्रा.कांत सोमवंशी, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

४. आर्थिक विचारांचा इतिहास-डॉ.विश्वास कदम, नक्षत्र प्रकाशन

५. आर्थिक विचारांचा इतिहास- डॉ.आर.डी. जाधवर/प्रा.एम. डी. तनपुरे/ डॉ.एस.जी. इंगळे/ डॉ.एन.आर. दांगट, अथर्व प्रकाशन, पुणे